MHND140007792026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९२/२०२६**
**भावना व इतर विरुध्द निरंक**

## <u>निशाणी क्र. १ वर आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत विवेक पि. सुरेशराव वझरकर यांची पत्नी आहे व अर्जदार क्र. २ व ३ ही मयत विवेक पि. सुरेशराव वझरकर यांची मुले आहेत. मयत विवेक पि. सुरेशराव वझरकर यांचा मृत्यु दि. ०९.०१.२०२६ रोजी झालेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत विवेक पि. सुरेशराव वझरकर यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून त्यांनी सदर अर्ज सादर केलेला आहे.

**३.** प्रकरणात अर्जदारांतर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे व दस्तऐवजांचे अवलोकन करता पुढील मुद्दे या न्यायालयाचे समक्ष आदेशासाठी उपस्थित झाले. ते मुद्दे व त्याबाबत करण्यात आलेल्या चर्चेला अनुसरुन निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिध्द करतात काय की, त्यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत काय ? | : | **<u>होय.</u>** |
| २. | आदेश काय ? | : | **<u>अंतिम आदेशाप्रमाणे.</u>** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u>** –

४. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर या अर्जाबाबत नि. क्र. १ वरील आदेशान्वये नोटीस व जाहीरनामा काढण्याबाबत आदेशीत करण्यात आले. त्यानुसार दैनिक श्रमिक एकजूट वर्तमानपत्रामध्ये जाहीरनामा प्रकाशीत करण्यात आला. सदरहु जाहीरनाम्याबाबत आजपावेतो कोणीही आक्षेप, उजर व हरकत नोंदविलेली नाही तसेच कोणीही हजर झालेले नाही.

५. अर्जदारांच्या विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचा युक्तीवाद नि.क्र. १ प्रमाणे तसेच अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्याप्रमाणे केला. अंतिमतः त्यांनी असे नमुद केले की, आजपावेतो जाहीरनाम्यास कोणीही आक्षेप, उजर व हरकत नोंदविली नाही म्हणून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६. अर्जदारांनी प्रस्तुत अर्जात केलेली कथने नाकारण्यासाठी कोणत्याही प्रकारची हरकत आजपर्यंत न्यायालयासमोर आलेली नाही. तसेच अन्य कोणताही इसम मृत व्यक्तीचा वारस असल्याचा दावा करण्याकरीता हजर झालेला नाही, अगर कोणताही आक्षेप, उजर तथा हरकत नोंदविण्यात आलेली नाही.

७. प्रस्तुत अर्जाबाबत अर्जदार क्र.१ भावना भ्र. विवेकराव वझरकर यांनी साक्षीदार क्र.१ म्हणुन नि.क्र. १२ प्रमाणे स्वतःचा पुरावा प्रतिज्ञापत्रावर सादर केलेला आहे व सदरहू पुरावा आजपावेतो अबाधीत असून त्याला कोणीही आव्हान दिले नाही.

८. अर्जदारांनी पुराव्यासोबत खालील दस्तऐवज दाखल केलेले आहेतः–

| अ. क्र. | कागदपत्रांचे विवरण | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | मयत विवेक पि. सुरेशराव वझरकर यांच्या मृत्युप्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. | १३ |
| २. | सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, वझर, ता. देगलूर यांनी दिलेले वारसा प्रमाणपत्राची प्रत. | १५ |
| ३. | अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आधारकार्डची पडताळणी केलेल्या प्रती. | १६ ते १८ |
| ४. | दि.०९.०४.२०२६ रोजी दैनिक श्रमिक एकजूट वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द जाहीरनामा. | ०९ |

**९.** उपरोक्त परिस्थितीत प्रस्तुत अर्जदार हे मयत विवेक पि. सुरेशराव वझरकर यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला देण्यास कोणताही अडथळा दिसून येत नाही. करीता मुद्दा क्र.१ साठी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीता –**

**१०.** मुद्दा क्र.१ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदविल्यामुळे मुद्दा क्र.२ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |
| ०२. | अर्जदार क्र. १ भावना भ्र. विवेकराव वझरकर, २. वरद पि. विवेकराव वझरकर व ३. वरुण पि. विवेकराव वझरकर यांना मयत विवेक पि. सुरेशराव वझरकर यांचे वारस म्हणून घोषीत करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ०३. | अर्जदार क्र.१ ते ३ यांचे नावे बॉम्बे रेग्युलेशनचे पुरवणी ब मधील विहीत नमुन्यातील वारस प्रमाणपत्र नियमाप्रमाणे योग्य ती कोर्ट फिस स्विकारुन देण्यात यावे. |

RAVINDRA RATHOD
Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2026.07.24 15:02:36 +0530

**( आर. एल. राठोड )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
देगलूर जि. नांदेड.

देगलूर.
दिनांक : २४.०७.२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the stenographer | Ganesh V. Kulkarni (Grade-3) |
| Name of Court | Shri. R.L. Rathod,<br>C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Degloor |
| Date of Dictation | 24/07/2026 |
| Judgment signed by the P.O. on | 24/07/2026 |
| Judgment/Order uploaded on | 24/07/2026 |